13-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/12/2025 11:29 PM Page 1



## निवडक



शिरोटी,खोला : ग्रामदेव लक्ष्मी नारायण देवस्थानच्या अध्यक्षपदी पारिजात प्र. प्रभुदेसाई.

### ग्रामदेव लक्ष्मी नारायण देवस्थानच्या अध्यक्षपदी पारिजात प्रभुदेसाई

■ *टीम दैनिक हेराल्ड*

आगोंद, दि. १२ : शिरोटी, खोला येथील श्री ग्रामदेव लक्ष्मी नारायण देवस्थानची कार्यकारिणी निवडण्यात आली. अध्यक्ष– पारिजात प्रभुदेसाई, उपाध्यक्ष– रघुवीर प्रभु खोलकर, सचिव– संतोष शेणवी कुलकर्णी, उपसचिव– प्रल्हाद प्रभुदेसाई, मुख्यत्यार– नितांत प्रभु खोलकर, उपमुख्यात्यार– सचिन प्रभु खोलकर, खजिनदार– श्री प्रशांत प्रभु कोंकर, उपखजिनदार–यदुवीर प्रभुदेसाई यांचा समावेश आहे.

---



नानोडा : येथील श्री शांतादुर्गा कलंगुटकरिण देवस्थानची बिनविरोध निवडून आलेली नूतन समिती.

### शांतादुर्गा कलंगुटकरीण देवस्थानच्या अध्यक्षपदी शंकर सावंत

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १२** : देवस्थान कायद्याअंतर्गत २०२५ ते २०२८ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी देवस्थान समिती निवडण्यासाठी देवस्थान प्रशासनाच्या आदेशानुसार रविवारी दिनांक ११ फेब्रुवारी रोजी देवस्थानच्या नोंदणीकृत महाजनांची सर्वसाधारण सभा श्री शांतादुर्गा कलंगुटकरीण देवस्थान सभागृहात बोलावण्यात आली होती . या सभेस निरीक्षक म्हणून मामलेदार कार्यालयातील अमर तिरोडकर यांची उपस्थिती होते. यावेळी देवस्थानचे महाजन मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी नूतन समितीची निवड बिनविरोध करण्याचा निर्णय घेतला , त्याप्रमाणे बिनविरोध निवड झाली . समितीचे पदाधिकारी पुढील प्रमाणे अध्यक्ष – शंकर सावंत, उपाध्यक्ष – शरद गाड , सचिव – संजय सावंत, उपसचिव – संतोष नाईक, खजिनदार – जयदेव गाड, उपखजिनदार – कालिनंद सावंत, मुखत्यार – मंगलदास सावंत , उपमुखत्यार – आनंदराव देसाई. यावेळी निवडून आल्यानंतर समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मंदिरात जावून श्रींचे दर्शन घेवून आशीर्वाद घेतला. देवस्थानचे माजी अध्यक्ष श्रीपाद सावंत यांनी निवडून आलेल्या सर्व समितीच्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पहार घालून त्यांचे अभिनंदन केले. समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना बरोबर घेवून

देवस्थानच्या प्रसिद्धीसाठी नवनवीन उपक्रम हाती घेण्यात येतील असे दुसऱ्यांदा बिनविरोध निवडून आलेल्या अध्यक्ष शंकर सावंत यांनी यावेळी सांगितले. सर्वांनी नवीन समितीचे अभिनंदन केले तर निवड समितीने उपस्थित सर्व महाजन वर्गांचे आभार मानले.




---

वाघुर्मे : शांतादुर्गा देवस्थानची नूतन कार्यकारिणी.

### वाघुर्मे शांतादुर्गा देवस्थानच्या अध्यक्षपदी विजय प्रभू

■ *टीम दैनिक हेराल्ड*

सावईवेरे दि. १२ : वाघुर्मे येथील श्री शांतादुर्गा देवस्थानची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी विजय प्रभू यांची बिनविरोध निवड करण्यात आली.
इतर समिती पुढीलप्रमाणे – उपाध्यक्ष – सोयरू प्रभू, सचिव – रुपेश प्रभू , सह सचिव – समीर प्रभू, खजिनदार – अनिल प्रभू, सह खजिनदार – प्रज्योत प्रभू, मुखत्यार – विजय प्रभू, सह मुखत्यार – नवनाथ प्रभू यांची निवड करण्यात आली.



---

सावईवेरे : अनंत देवस्थानची नूतन कार्यकारिणी.

### अनंत देवस्थानची नवीन कार्यकारिणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. १२** : सावईवेरे येथील श्री अनंत देवस्थानची सर्वसाधारण सभा येथील श्री मदनंत सभागृहात होऊन नवीन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी राहुल शेट वेरेकर यांची निवड करण्यात आली. इतर मुख्य समिती पुढीलप्रमाणे – सचिव – विनायक शेट वेरेकर, खजिनदार – निखिल शेट वेरेकर, मुखत्यार – दत्तराज शेट वेरेकर यांची निवड झाली. याशिवाय पर्यायी समिती निवडण्यात आली. पर्यायी समिती पुढीलप्रमाणे – अध्यक्ष – अमेय शेट वेरेकर, सचिव – विभव शेट वेरेकर, खजिनदार – अमोल शेट वेरेकर, मुखत्यार – रीलेश शेट वेरेकर यांची निवड करण्यात आली.

# भारताचा इंग्लंडला व्हाईटवॉश

## अखेरचा वनडे १४४ धावांनी जिंकला : शुभमन गिलचे दमदार शतक

**अहमदाबाद, दि. १२ :**




शुबमन गिलचे (११२) दमदार शतक, श्रेयस अय्यर (७८) आणि विराट कोहली (५२) यांच्या शानदार अर्धशतकानंतर गोलंदाजांनी केलेल्या शानदार कामगिरीच्या जोरावर टीम इंडियाने अखेरच्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडवर तब्बल १४२ धावांनी विजय मिळविला. या विजयासह भारताने एकदिवसीय मालिका ३–० ने जिंकत इंग्लंडला व्हाईटवॉश दिला. भारताने प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडसमोर ३५६ धावांचे बलाढ्य लक्ष्य ठेवले होते. मात्र, गोलंदाजांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर इंग्लंडला २१४ धावांत रोखले व १४२ धावांनी मोठा विजय मिळविला.

भारताकडून मिळालेल्या ३५७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना फिल साल्ट आणि बेन डकेट यांनी मालिकेत नियमितपणे इंग्लंडला चांगली सुरुवात करून दिली आहे, परंतु इतर फलंदाज त्याचा फायदा उठवण्यात अपयशी ठरले आहेत. यावेळी दोघांमध्ये ६० धावांची सलामी भागीदारी झाली, पण त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी इतके वर्चस्व गाजवले की १५४ धावांपर्यंत इंग्लंडचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये परतला. येथून इंग्लंडचा पराभव निश्चित होता. कर्णधार जोस बटलर चांगल्या फॉर्ममध्ये आहे, पण तिसऱ्या सामन्यात तो फक्त ६ धावा काढून बाद झाला आणि जो रूटही २४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. भारताकडून अर्शदीप सिंग, हर्षित राणा, अक्षर पटेल आणि हार्दिक पांड्या यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. वॉशिंग्टन सुंदर आणि कुलदीप यादव यांनाही प्रत्येकी एक विकेट घेण्यात अपयश आले.

तत्पूर्वी, इंग्लंडने नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीस आमंत्रित केले. भारताची सुरुवात चांगली झाली नाही. भारताला रोहित शर्माच्या रुपात सुरुवातीलाच धक्का बसला, त्याला एकच धाव करता आली. पण त्यानंतर शुभमन गिल आणि विराट कोहली यांनी भारताचा डाव सावरला. विराट कोहलीने यावेळी अर्धशतक झळकावत दुसऱ्या विकेटसाठी गिलसोबत ११६ धावांची भागीदारी रचली. विराटने यावेळी सात चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५२ धावांची खेळी साकारली. विराट बाद झाल्यावरही गिलने आपली फटकेबाजी सुरुच ठेवली.

गिलने त्यानंतर श्रेयस अय्यरच्या साथीने मोठी भागीदारी रचली. गिलने अर्धशतकानंतर शतकाच्या दिशेने कूच केली. गिलने धडाकेबाज फटकेबाजी करत यावेळी आपले शतक साकारले. गिलसाठी हे शतक महत्वाचे ठरले. कारण गेल्या दोन्ही सामन्यांत त्याला शतकाने हुलकावणी दिली होती. पण यावेळी मात्र गिलने शतक पूर्ण करत ती कसर भरून काढली. गिलने यावेळी १०२ चेंडूंत १४ चौकार आणि तीन षटकारांच्या जोरावर ११२ धावांची दमदार खेळी साकारली. गिलचे शतक झाले असले तरी श्रेयसचे शतक यावेळी हुकले. श्रेयसने यावेळी ६४ चेंडूंत ८ चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ७८ धावा केल्या. गिलचे शतक आणि विराट व श्रेयसच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताला ३५६ धावांचा डोंगर उभारता आला.

### कोहलीने रचला विक्रम

**तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीने ५५ चेंडूत ५२ धावा केल्या, ज्यात ७ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. यासह त्याने आशियातील आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६००० धावा पूर्ण केल्या. तो आशियामध्ये सर्वात जलद १६००० धावा करणारा फलंदाज ठरला. त्याने हे फक्त ३४० डावांमध्ये केले आहे आणि नंबर–१ स्थान मिळवले आहे. महान फलंदाज सचिन तेंडुलकरने आशियामध्ये ३५३ डावांमध्ये १६००० आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण केल्या होत्या. आतापर्यंत आशियामध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फक्त चार फलंदाजांनी सोळा हजारांपेक्षा जास्त धावा केल्या आहेत.**

## जसप्रीत बुमराह चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर

**अहमदाबाद, दि. १२ :**



चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारताला अजून एक मोठा धक्का बसला आहे. जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे या स्पर्धेत खेळणार नसल्याचे समोर आल्यावर आता भारताला अजून एक मोठा धक्का बसला आहे. कारण भारताच्या मॅचविनर खेळाडूला गंभीर दुखापत झाली आहे. भारताचा कर्णधार रोहित शर्मानेच आता ही माहिती दिली असून त्याची चिंता आता आणखी वाढलेली आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीला सुरुवात होण्यापूर्वी आता भारताला एकामागून एक धक्के बसायला सुरुवात झाली आहे. मंगळवारी रात्री जसप्रीत बुमराह चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळणार नसल्यो वृत्त आले आणि सर्वांनाच मोठा धक्का बसला. जसप्रीत बुमराहच्या जागी आता हर्षित राणा हा भारतीय संघात आला आहे. या गोष्टीला २४ तासही झाले नाहीत तर भारताला अजून एक मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आता भारतीय संघात नेमकं चाललंय तरी काय, असा प्रश्न चाहते विचारायला लागले आहेत.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा वनडे सामना सुरु होण्यापूर्वी रोहित शर्माने याबाबतची माहिती दिली. रोहित शर्मा या तिसऱ्या मॅचच्या टॉससाठी मैदानात आला होता. टॉसनंतर रोहित शर्माने सांगितले की, तिसऱ्या वनडे सामन्यात आम्हाला काही मोठे बदल करावे लागले आहेत. भारतीय संघातील अजून एका खेळाडूला दुखापत झाली आहे. वरुण चक्रवर्तीच्या पायांच्या पोटऱ्यांमध्ये गंभीर दुखापत झाली आहे. ही दुखापत गंभीर असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्याला तिसऱ्या वनडे सामन्यात खेळता येणार नाही. वरुणच्या दुखापतीवर आम्ही लक्ष ठेवून आहोत आणि यापुढे त्याच्याबाबत काय निर्णय घ्यायचा हे वैद्यकीय अहवाल समोर आल्यावरच ठरवणार आहोत. वरुण चक्रवर्तीला यशस्वी जयस्वालच्या जागी भारतीय संघात स्थान देण्यात आले होते.

# तरुणांनी शेतीकडे वळा, आदर्श निर्माण करा

## किशोर भावे : जय किसानच्या पीक परिसंवादमध्ये शेतकऱ्यांना मार्गदर्शन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साळ, दि. १२** : शेतीच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्न देणाऱ्या शेतीकडे वळावे. तरुणांनी धैर्याने शेतीकडे वळून साळ गावातच नवनवीन प्रयोग करावे आणि आर्थिक उन्नती करून गोव्यात वेगळा आदर्श निर्माण करावा, असे प्रतिपादन गोवा कृषी विभागाचे उपसंचालक किशोर भावे यांनी साळ येथील जय किसान जंक्शनच्या पीक परिसंवाद या कार्यक्रमात केले.

यावेळी झुआरी फार्महबचे झोनल हेड विजय कुंटे, साळ सरपंच सावित्री घाडी, पुणे येथील ग्रीनोजचे व्यवस्थापक संतोष कोराडे, एरिया मॅनेजर मंदार सावईकर, डिचोली विभागीय कृषी अधिकारी निलीमा गावस, पशुसंवर्धन विभागाचे कृषी सहाय्यक आत्माराम राऊत आदी मान्यवर उपस्थित होते तसेच या परिसंवादास तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**साळ : येथे झुआरी फार्महबच्या पिक परिसंवादाचे दीप प्रज्वलन करताना ग्रीनोजचे संतोष कोराडे. सोबत (डावीकडून) निलिमा गावस, सरपंच सावित्री घाडी, कृषी उपसंचालक किशोर भावे, विजय कुंटे व मंदार सावईकर.**

साळ गावातील शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून शेतीत मेहनत केली. तर वर्षाकाठी लाखो रुपये जमिनीतून कमवू शकतात. सिंचन क्षेत्रात असणारी एक गुंठाही जमीन शेतकऱ्यांनी पडीक ठेवू नये. त्याचा पूर्ण फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा. त्याचबरोबर शासकीय योजनांचा लाभ वेळोवेळी घ्यावा असे आवाहन कृषी उपसंचालक किशोर भावे यांनी उद्घाटनप्रसंगी केले. तर केम्फ्री वॉमक्स, केम्फ्री गोल्ड या बाबत ग्रीनोजचे व्यवस्थापक संतोष कोराडे यांनी मार्गदर्शन केले. नॅनो युरिया, नॅनो डीएपी, गोशक्ती याबाबत मंदार सावईकर यांनी मार्गदर्शन केले. तर शासनाच्या विविध योजनाची माहिती विभागीय कृषी अधिकारी निलीमा गावस यांनी दिली. प्रास्ताविक मंदार सावईकर यांनी केले. सरपंच सावित्री घाडी यांनी कृषी योजनांचा लाभ घेत आधुनिक शेती करावी असे प्रतिपादन केले. यावेळी झुआरी ग्रो ची विविध उत्पादने माहिती साठी व विक्रीसाठी उपलब्ध केली होती, तसे उपस्थित शेतकऱ्यांना केम्फ्री वामैक्स सुपर प्रती एक किलो चे उत्पादन प्रत्येक शेतकऱ्याला भेट स्वरूप देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमित दळवी यांनी केले तर कौशल्य तेंडुलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मॅनेजर सागर सावंत, अक्षय शेगडे, सुयश गवस, कौस्तुभ राणे यांनी प्रयत्न केले.




RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 161 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .